MHJN060000292016

## आदेश निशाणी क्रमांक ३३ वर पारित

१) वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी यांनी दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णया पावेतो दावा मिळकतीचे परस्पर हस्तांतरण करु नये, म्हणून त्यांच्याविरुध्द तातपुरता मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२) सदरील अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रमांक १ ही वादी क्रमांक १ यांची सख्खी जाऊ आहे. तसेच प्रतिवादी क्रमांक २ ते ४ हे प्रतिवादी क्रमांक १ यांचे मुले आहेत. तसेच प्रतिवादी क्रमांक ५ व ६ या वादी क्रमांक १ व प्रतिवादी क्रमांक १ यांच्या सख्ख्या ननंदा आहेत. वादी क्रमांक १ व प्रतिवादी क्रमांक १ यांचे सासरे नामे—शंकर परसराम मिसाळ हे मौजे निंबोळा, ता.भोकरदन येथील रहिवासी होते. त्यांना दोन मुले म्हणजेच वादी क्रमांक १ चे पती नामे— गौतम मिसाळ व प्रतिवादी क्रमांक १ यांचे पती नामे— उत्तम मिसाळ. तसेच दोन मुली म्हणजे प्रतिवादी क्रमांक ५ व ६ आहेत. वादी क्रमांक १ चे पती नामे— गौतम मिसाळ यांचा सन १९९६ साली रस्ता अपघातात मृत्यू झाालेला आहे व त्यांच्या पश्चात वादी क्रमांक १ व २ हे मयताचे वारस आहेत. तसेच प्रतिवादी क्रमांक १ चे पती नामे— उत्तम मिसाळ हे जन्मापासून दुर्धर आजाराने ग्रस्त होते. त्यामुळे सदरील आजारपणामुळे त्यांचा देखील सन १९९६ मध्ये मृत्यू झालेला आहे. तसचे उत्तम व गौतम यांचा मृत्यू झाल्यामूळे त्यांचे वडील नामे— शंकर परसराम मिसाळ यांचा देखील सन १९९६ मध्ये वृध्दपकाळाने दु:खद निधन झालेले आहे.

३) वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, शंकर परसराम मिसाळ यांनी त्यांच्या हयातीत सदरील दावा मिळकत पुर्वीचे मालक नामे— प्रभाकर गजाननराव देशपांडे यांच्याकडून नोंदणीकृत खरेदी खत क्रमांक ५३/१९८६ अन्वये दिनांक ०७/०१/१९८६ रोजी विकत घेतलेली आहे. परंतु त्यांचा मुलगा नामे— उत्तम बालपणापासून आजारी असल्यामुळे, त्याच्या आजारपणावर कुटूंबीयांनी दुर्लक्ष करु नये, म्हणून प्रेमापोटी सदरील खरेदीचा व्यवहार उत्तम शंकर यांच्या नावे केला होता. परंतु सदरील खरेदी खताचा मोबदला स्वत: शंकर परसराम मिसाळ यांनी दिलेला आहे. त्यामुळे सदरील दावा मिळकत ही वादी यांच्या हिंदु एकत्र कुटूंबाची मिळकत आहे व त्यामध्ये त्यांचा कायदेशीर हिस्सा आहे.

०४) वादी यांनी पुढे असे नमूद केले आहे की, सदरील शंकर परसराम मिसाळ यांचे मौजे निंबोळा, ता.भोकरदन येथे शेत गट क्रमांक ४२ मध्ये २ हे. ३६ आर. ही वडिलोपार्जित शेत जमीन होती. परंतु सदरील शेत जमीन शंकर परसराम मिसाळ यांनी त्यांचा मुलगा उत्तम शंकर मिसाळ याच्या आजारपणाचा खर्च भागवण्यासाठी नोंदणीकृत खरेदी खत क्रमांक १८६६/१९८७ अन्वये दिनांक ०६/०७/१९८७ रोजी विक्री केलेली आहे व सदरील रकमेतून उत्तम शंकर याचा आजारपणाचा खर्च भागविलेला आहे. वादी क्रमांक १ व प्रतिवादी क्रमांक १ यांचे पती व सासरे मयत झाल्यानंतर वादी क्रमांक १ यांनी सदरील दावा मिळकतीमध्ये वाटप करुन मिळण्याची मागणी प्रतिवादी क्रमांक १ यांच्याकडे केली होती. परंतु त्यावेळेस प्रतिवादी क्रमांक ३ व ४ यांच्या विवाहाचे कारण दर्शवून सदरील वाटप करुन देण्यास प्रतिवादी क्रमांक १ यांनी टाळाटाळ केली. त्यानंतर सदरील दावा मिळकतीस वारस म्हणून वादी व प्रतिवादींचे नावे नमूद करण्याऐवजी प्रतिवादी क्रमांक १ यांनी त्यांचे व प्रतिवादी क्रमांक २ ते ४ यांच्या नावाने बेकायदेशीर वारसाचा फेर घेतलेला आहे. तसेच त्यानंतर दिनांक १८/१२/२०१५ रोजी प्रतिवादी यांनी वादीस दावा

मिळकतीमध्ये वाटप करुन देण्यास नकार दिलेला आहे.

५) वादी यांनी पुढे असे नमूद केले आहे की, सदरील दावा मिळकतीमध्ये त्यांचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. परंतु प्रतिवादी यांनी वाटप करण्यास नकार देवून प्रतिवादी हे सदरील दावा मिळकतीचे परस्पर हस्तांतर करण्याच्या तयारीत आहेत. त्यानुसार प्रतिवादी कमांक २ यांनी सरदील दावा मिळकतीचे ३३ बाय ३३ चे भुखंड तयार करुन जमीन विक्री करण्यास सुरवात केलेली आहे. सदरील प्रतिवादी कमांक २ यांनी दिनांक ०१/१०/२०१८ रोजी सदरील दावा मिळकतीमध्ये ३३ बाय ३३ आकाराचा भुखंड रमेश धोंडु शिंदे यांना हस्तांतरीत केलेला आहे. त्यामुळे वरील प्रमाणे प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे परस्पर हस्तांतरण केल्यास वादीचा प्रस्तुत दावा दाखल करण्याचा उद्देश असफल होईल. म्हणून सदरील दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णया पावेतो प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे परस्पर हस्तांतरण करु नये, म्हणून त्यांच्याविरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याची मागणी वादी यांनी केलेली आहे.

६) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी कमांक १ ते ४ यांनी निशाणी कमांक २६ अन्वये खुलासा दाखल करून वादी सोबतचे नातेसंबंध मान्य करुन त्यांच्याविरुध्द असलेला इतर सर्व मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादी यांनी असे नमूद केले आहे की, शंकर परसराम मिसाळ यांना कुठलीही वडिलोपार्जित शेत जमीन नव्हती. मौजे निंबोळा येथे शेत गट कमांक ४२ मध्ये २ हे. ३६ आर. शेत जमीन ही शंकर मिसाळ यांची स्वकष्टार्जित मिळकत होती. सदरील मिळकत देखील शंकर परसराम मिसाळ यांनी स्वत:च्या दारुच्या व्यसनापायी विक्री केलेली आहे. तसेच वादी कमांक १ चे पती नामे— गौतम मिसाळ यांना देखील दारुचे व्यसन होते. त्यामुळे गौतम मिसाळ, शंकर मिसाळ व प्रतिवादी कमांक १ यांचे पती नामे— उत्तम मिसाळ यांच्यात नेहमी भांडण तंटा होत असे. त्यामुळे उत्तम मिसाळ यांनी त्यांच्या विवाहापुर्वीच आपले गाव सोडून मौजे कोळेगांव

येथे प्रतिवादी क्रमांक १ यांचे मामा नामे— संपत यादव चोथमल यांची बटाईने शेती करण्यास सुरवात केली होती. तसेच सदरील संपत यादव चोथमल यांच्या मध्यस्थीने उत्तम मिसाळ व प्रतिवादी क्रमांक १ यांचा विवाह झालेला आहे. तसेच उत्तम मिसाळ यांनी सन १९८४ मध्ये निंबोळा येथे किराणा दुकान व्यवसायास सुरवात केली होती. सदरील व्यवसायाच्या नफयातून दिनांक ०७/०१/१९८६ रोजी त्यांनी सदरील दावा मिळकत नोंदणीकृत खरेदी खत क्रमांक ५३/१९८६ अन्वये विकत घेतलेली आहे व त्याबाबत महसूल फेरफार नोंद क्रमांक १७ मंजूर झालेला आहे. त्यामुळे सदरील दावा मिळकत ही वादी यांची वडिलोपर्जित मिळकत नसून, सदरील दावा मिळकत ही उत्तम शंकर मिसाळ यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. त्यामुळे सदरील मिळकतीमध्ये मयत नामे— शंकर परसराम मिसाळ तसेच मयत नामे— गौतम शंकर मिसाळ व वादी यांचा कुठलाही हक्क व अधिकार नाही.

७) सदर प्रतिवादी यांनी पुढे असे नमूद केले आहे की, उत्तम शंकर मिसाळ यांना बालपणापासून कुठलाही दुर्धर आजार नव्हता. तसेच सदरील शंकर परसराम मिसाळ यांनी मौजे निंबोळा येथील शेत जमीन गट क्रमांक ४२ ही उत्तम मिसाळ यांच्या आजारपणासाठी विक्री केलेली नसून स्वत:च्या व्यसनापायी विक्री केलेली आहे. तसेच उत्तम मिसाळ यांच्या मृत्यूनंतर सदरील दावा मिळकत मयताचे वारस म्हणून महसूल फेरफार नोंद क्रमांक १३५ अन्वये प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांच्या नावे हस्तांतरित झालेली आहे. तसेच सदरील फेरफार नोंद दिनांक ०६/०१/१९९६ रोजी मंजूर झालेली असताना, तेव्हापासून आज पावेतो सदरील नोंदीस वादी यांनी कुठेही आव्हानित केलेले नाही. प्रतिवादी यांनी, ते सदरील दावा मिळकत हस्तांतरित करत असल्या बाबतचे वादीचे सर्व कथन नाकारलेले आहे. तसेच सदरील दावा मिळकतीत वादींचा कायदेशीर हिस्सा देखील प्रतिवादी यांनी नाकारलेला आहे. सदरील दावा मिळकत ही मयत उत्तम मिसाळ यांची स्वकष्टार्जित मिळकत असल्याचे कथन

करुन सदरील मिळकतीमध्ये वादींचा कुठलाही हक्क व अधिकार नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

८) प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील लेखी म्हणणे तसेच मुळ दावा व अभिलेखावर असलेल्या सर्व दस्त ऐवजांचे अवलोकन केले. तसेच वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. असे की, वरील सर्व बाबींचा विचार केला असता, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात व त्यावरील माझा निष्कर्ष कारण मिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजून आहे काय ? | नाही |
| ३. | प्रस्तुत अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | नाही |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

## मुददा क्रमांक ०१ ते ०३ करीता -

९) वादी यांनी प्रस्तुतचा मुळ दावा वाटप व स्वतंत्र ताब्यासाठी तसेच कायम मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदरील दाव्यात यापुर्वी निशाणी क्रमांक ५ अन्वये वादींचा तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल होता. परंतु सदरील अर्जात वादी यांनी कुठलेही स्वारस्य दाखविले नाही. म्हणून माझे पुर्वाधिकारी यांनी दिनांक १९/१२/२०१६ रोजी सदरील अर्जावर गुणवत्तेवर आदेश पारित न करता, सदरचा अर्ज दप्तरी दाखल (filed) करुन घेतला आहे. त्यानंतर दिनांक ०५/०७/२०१७ रोजी निशाणी क्रमांक २९ अन्वये सदरील दाव्यात वाद मुद्दे निश्चित झालेले आहेत व तेव्हापासून सदरील दावा वादीच्या

पुराव्यासाठी प्रलंबित आहे. त्यानंतर वादी यांनी दिनांक ०८/०१/२०१९ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

१०) प्रस्तुत प्रकरणात आपसातील नाते संबंधाबाबत दोन्ही पक्षकारांमध्ये वाद नाही. सदरील प्रकरणात महत्वाचा वाद असा आहे की, वादीच्या म्हणण्याप्रमाणे सदरील दावा मिळकत त्यांचे सासरे नामे— शंकर परसराम मिसाळ यांनी स्वत:च्या कमाईतून विकत घेऊन प्रतिवादी क्रमांक १ यांचे पती नामे— उत्तम मिसाळ यांच्या नावे केलेली आहे. त्यामुळे शंकर परसराम मिसाळ यांच्या मृत्यूनंतर गौतम मिसाळ यांचे वारस म्हणून वादींचा सदरील दावा मिळकतीमध्ये कायदेशीर हिस्सा आहे. याउलट सदरील दावा मिळकत शंकर परसराम मिसाळ यांनी दिलेल्या रक्कमेतून विकत घेतलेली असल्याचे प्रतिवादी यांनी नाकारुन सदरील दावा मिळकत ही उत्तम मिसाळ यांची स्वकष्टार्जित मिळकत असल्याचे कथन करुन त्यांनी त्यामध्ये वादीचा हिस्सा स्पष्टपणे नाकारलेला आहे.

११) वादींच्या म्हणण्याप्रमाणे शंकर परसराम मिसाळ यांचे निंबोळा येथे शेत गट क्रमांक ४२ मध्ये २ हे. ३६ आर. ही वडिलोपार्जित शेत जमीन होती व सदरील शेत जमीन त्यांनी उत्तम मिसाळ यांच्या आजारपणाचा खर्च भागविण्यासाठी दिनांक ०६/०७/१९८७ रोजी विक्री केलेली आहे. सदरील बाब प्रतिवादी यांनी नाकारलेली आहे. वादी यांनी सदरील व्यवहाराबाबत त्यांच्या कथनांच्या समर्थनार्थ उत्तम मिसाळ हे दुर्धर आजारी होते, हे दाखविण्यासाठी काही तरी वैद्यकीय प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल करणे आवश्यक होते. परंतु त्याबाबतचे कुठलेही वैद्यकीय प्रमाणपत्र किंवा इतर प्रथमदर्शी पुरावा वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच सदरील शेत गट क्रमांक ४२ मधील शेत जमीन शंकर परसराम मिसाळ यांची वडिलोपार्जित मिळकत असल्याबाबत व सदरील मिळकतीचा मोबदला त्यांनी उत्तम मिसाळ यांच्या आजारपणासाठी खर्च केल्याबाबत देखील कुठलाही प्रथमदर्शनी पुरावा, म्हणजेच सदरील

मिळकतीचे महसूल अभिलेख व विक्री केल्याबाबत खरेदी खताची प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. त्यामुळे वादीच्या सदरील कथनात देखील प्रथमदर्शी तथ्य दिसून येत नाही.

१२) वादी यांनी निशाणी क्रमांक ४३ च्या दस्त यादीसोबत मयत शंकर परसराम मिसाळ यांनी वादी क्रमांक १ यांच्या हक्कात करुन दिलेल्या संमती पत्राची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यामध्ये सदरील दावा मिळकत शंकर परसराम मिसाळ यांनी दिलेल्या मोबदल्यात विकत घेतलेली असल्याचे कथन आहे. तसेच सदरील दावा मिळकतीमधील ८० आर. क्षेत्रावर वादी क्रमांक २ यांचा कायदेशीर हिस्सा असल्याचे कथन आहे. सदरील दस्त प्रतिवादी यांनी नाकारलेला आहे. तसेच आज रोजी शंकर परसराम मिसाळ मयत असल्याचे दोन्ही पक्षकारांना मान्य आहे. तसेच सदरील दस्त दिनांक ०७/१०/१९९६ रोजीचा आहे व वादातील खरेदी खत दिनांक ०७/०१/१९८६ रोजीचे आहे. म्हणजेच सदरील दस्त व दावा मिळकतीचे खरेदी खत यामध्ये साधारणत: दहा वर्षांचे अंतर आहे. तसेच वादीच्या म्हणण्याप्रमाणे शंकर परसराम मिसाळ हे देखील सन १९९६ मध्ये मयत झालेले आहे. परंतु त्यांची निश्चित मृत्यू दिनांक किंवा त्याबाबतचे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. अश्या परिस्थितीत सदरील संमती पत्रातील मजकुर खरेदी खतातील मजकुराशी मिळता—जुळता आहे किंवा नाही हे पडताळून पाहणे आवश्यक आहे.

१३) दावा मिळकतीचे खरेदी खत क्रमांक ५३/१९८६ ची छायांकित प्रत वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदरील दस्ताचे सुक्ष्म अवलोकन केले असता, सदरील मिळकत उत्तम शंकर मिसाळ यांनी प्रभाकर गजानन देशपांडे यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेतलेली असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते. तसेच सदरील खरेदी खताच्या मजकूरामध्ये सदरील खरेदी खताचा मोबदला किंवा त्यांचा काही भाग शंकर परसराम मिसाळ यांनी दिलेला

असल्याबाबत देखील कुठलेही कथन नमूद नाही. तसेच सदरील दावा मिळकत विकत घेण्यास शंकर परसराम मिसाळ यांनी पैसे दिल्याबाबत देखील इतर कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. अश्या परिस्थितीत सदरील छायांकित संमती पत्रातील मजकुरा ऐवजी वादातील नोंदणीकृत खरेदी खतातील मजकूर विश्वासपात्र व खरा असल्याचे गृहित धरावे लागेल. त्यामुळे सदरील दावा मिळकतीबाबत मयत शंकर परसराम मिसाळ यांना कुठलाही कायदेशीर अधिकार नव्हता ही बाब प्रथमदर्शी दिसून येते. अश्या परिस्थितीत त्यांचे सदरील संमती पत्र सुनावणीच्या या टप्प्यावर विचारात घेणे योग्य नाही.

१४) याउलट सदरील दावा मिळकत उत्तम मिसाळ यांची स्वकष्टार्जित मिळकत असल्याचे कथन प्रतिवादी यांनी केलेले आहे व सदरील मिळकत त्यांनी किराणा व्यवसायाच्या नफयातून विकत घेतलेली असल्याचे कथन केलेले आहे. सदरील कथनाच्या समर्थनार्थ प्रतिवादी यांनी काही दस्त अभिलेखावर दाखल केलेले आहेत. त्यामध्ये दस्त क्रमांक ४ चे अवलोकन केले असता सन १९८९ मध्ये सदरील किराणा दुकानासाठी उत्तम मिसाळ यांनी बॅक कर्ज घेतलेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यावरुन उत्तम मिसाळ यांचे पुर्वी किराणा दुकान होते, ही बाब प्रथमदर्शी दिसून येते.

१५) एकंदरीत, सदरील दावा मिळकतीचा विचार केला असता सदरील दावा मिळकत वादी यांची वडिलोपार्जित मिळकत असल्याबाबत प्रथमदर्शी पुरावा अभिलेखावर नाही. याउलट, सदरील दावा मिळकत उत्तमराव मिसाळ यांची स्वकष्टार्जित मिळकत असल्याबाबत सदरील खरेदी खताची छायांकित प्रत व त्याचा प्रथमदर्शी पुरावा असल्याचे अभिलेखावरुन स्पष्ट होते. तसेच सदरील दावा मिळकत विकत घेतली त्यावेळेस शंकर मिसाळ, गौतम मिसाळ व उत्तम मिसाळ हे एकत्र कुटूंबात राहत होते, याबाबत देखील वादी यांनी कुठलाही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे सदरील दावा मिळकतीमध्ये गौतम मिसाळ यांचे वारस म्हणून वादी यांचा कायदेशीर हक्क

असल्याचे प्रथमदर्शी दिसून येत नाही.

१६) तसेच दावा मिळकतीमध्ये भुखंड हस्तांतरणाबाबत वादी यांनी निशाणी क्रमांक ३७ च्या दस्त यादीसोबत काही करार नामा दस्त अभिलेखावर दाखल केलेले आहे. परंतु त्यातील भुखंड विकत घेणा—या व्यक्तींना वादींनी प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट केलेले नाही. एकंदरीत प्रस्तुतचा दावा जरी वाटपासाठी दाखल केलेला असला तरी, प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादी यांना त्यांच्या मालकीच्या जमिनीचे हस्तांतरण करण्याबाबत प्रतिबंध निर्माण होईल. त्यामुळे वादी ऐवजी प्रतिवादी यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. याउलट सदरील दाव्याचे स्वरुप व मागणी विचारात घेता, पुराव्याअंती वादींनी त्यांचा दावा सिध्द केला तर मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ चे कलम ५२ चे सरंक्षण वादींच्या हक्कात आहे.

१७) एकंदरीत, सदरील दावा मिळकत वडिलोपार्जित असल्याबाबत प्रथमदर्शी पुरावा अभिलेखावर नाही. म्हणून वरील कारण मिमांसेचा विचार केला असता, प्रथमदर्शी केस व न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने नाही. तसेच सदरील अर्ज मंजूर केल्यास वर नमूद केल्याप्रमाणे वादी ऐवजी प्रतिवादी यांचे नुकसान होईल. म्हणून, **मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे**.

**मुद्दा क्रमांक ४ करीता —**

१८) मुद्दा क्रमांक ४ च्या निष्कर्षा करीता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आदेश

वादींचा प्रस्तुतचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by Bharat Santaram Jagdale
Date: 2020.09.29 13:14:40 +0530

ठिकाण—भोकरदन
दिनांक २९/०९/२०२०

(भरत सं. जगदाळे)
सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
भोकरदन.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येत आहे की, पी.डी.एफ. संचिकेतील शब्द नि शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेकाचे नाव : – ए.आय.शेख
न्यायालयाचे नाव :– सह दिवाणी न्यायालय क.स्तर, भोकरदन
दिनांक :– २९/०९/२०२०

स्वाक्षरित/–
लघुलेखक वर्ग–३